# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.११ /का-६,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १० मे, २०१६.

प्रति,
जिल्हाधिकारी (सर्व)

विषय:- राज्यातील विश्वविद्यालये, त्यांच्या अधिनस्त महाविद्यालये व
विद्यार्थी-विद्यार्थींनी यांची मदत घेणे...
नगर परिषदा/नगर पंचायती, जिल्हा परिषदा/पंचायत समित्या, महानगरपालिका,
यांच्या सार्वत्रिक निवडणुका नोव्हेंबर-२०१६ ते मार्च-२०१७

संदर्भ:- १) आयोगाचे आदेश क्र-रानिआ/२०१५/प्र.क्र.३/प्रकल्प कक्ष, दिनांक-१७/४/२०१५
२)आयोगाचे पत्र क्र. रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.७/का-६, दिनांक-१०/७/२०१५
३) आयोगाचे मनपा आयुक्तांना लिहिलेले अ.शा.पत्र क्र. रानिआ/मनपा-२०१५/प्र.क्र.३२/का-५, दिनांक-२४/११/२०१५.
४) आयोगाचे पत्र क्र. रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.१९/का-६, दिनांक-१/२/२०१६
५) आयोगाचे पत्र क्र. रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.३/का-६, दिनांक-६/२/२०१६

महोदय,

आपणास माहित आहे की, राज्यातील सुमारे १९५ नगरपरिषदा/नगर पंचायती, २६ जिल्हा परिषदा, २९६ पंचायत समित्या व १० महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका मार्च-२०१७ पूर्वी होणार आहेत.

२. या निवडणुकांमध्ये इतर बाबींशिवाय खालील दोन बाबींवर लक्ष केंद्रीत करण्याचे आयोगाने ठरविले आहे:-

(i) मतदार यादी अद्ययावत व बिनचूक करणे, व

(ii) मतदानाची टक्केवारी वाढविणे.

या दोन्ही विषयांवर आपल्याला मोठया प्रमाणावर नवीन तंत्रज्ञानाच्या मदतीने शास्त्रोक्त पध्दतीने जनजागृती मोहीम राबवावयाची आहे. याविषयी आयोगाने वेळोवेळी संदर्भीय पत्रान्वये सूचना दिलेल्या आहेत, त्यांचे अवलोकन करावे.

३. नगर परिषदा/नगर पंचायती यांच्या निवडणुका डिसेंबर-२०१६ पूर्वी होणार असल्याने विद्यापीठे व त्यांच्या अधिनस्त असलेल्या महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या आणि दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनींची नावे मतदार यादीमध्ये समाविष्ट होणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेता आयोगाने विद्यापीठांचे सर्व कुलगुरु व महत्वाच्या विद्यापीठांचे प्राचार्य यांच्यासोबत मागील २-३ महिन्यांमध्ये अनेक बैठका घेतलेल्या आहेत. या बैठकांमध्ये सर्व कुलगुरुंनी स्वतःहून वरील कामाकरिता आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्याचे मान्य केले आहे. या बैठकांचे इतिवृत्त माहितीकरिता सोबत जोडले आहे.

४. विद्यापीठांनी खालील महत्वाची कामे करण्याचे मान्य केले आहे :-

(i) शक्यतो प्रत्येक महाविद्यालयामध्ये मतदार नोंदणी कार्यालय उघडणे व त्याकरिता नोडल अधिकारी नेमणे.

(ii) विद्यार्थ्यांना प्रवेश देताना त्यांचे नाव मतदार यादीत नोंदविले असल्याबाबत खात्री करणे.

(iii) वर्ष-२०१६-१७ स्थानिक लोकशाही दिवस म्हणून साजरा करणे.

(iv) विद्यापीठे व महाविद्यालयांमार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रत्येक कार्यक्रमांमध्ये, उदा. कार्यशाळा, सेमिनार, चर्चासत्र, कॉलेज फेस्टिव्हल, खेळ, स्पर्धा, इत्यादींमध्ये "लोकशाही बळकटीकरण" ही संकल्पना राबविणे, इत्यादी.

५. ज्याअर्थी, सर्व कुलगुरु यांनी या दोन्ही कामांमध्ये (मतदार नोंदणी व मतदानाची टक्केवारी वाढविणे) संपूर्ण सहकार्य करण्याचे मान्य केले आहे, त्याअर्थी आपली जबाबदारी आहे की, आपण त्या त्या विद्यापीठे, महाविद्यालये यांच्याशी समन्वय साधून वेळापत्रक ठरवून कार्यवाही करावी. मला

आपल्याला असे कळविण्याचे मा. आयुक्तांचे आदेश आहेत की, आपण संबंधित विद्यापीठांचे कुलगुरु / त्यांचे प्रतिनधी, महानगरपालिका आयुक्त, काही विद्यापीठांचे प्राचार्य, इत्यादींच्या बैठका घेऊन विद्यापीठे व त्यांच्या अधिनस्त असलेली महाविद्यालये यांची मदत कशी घेता येईल याबाबत आराखडा तयार करावा तो आराखडा राज्य निवडणूक आयोगास दिनांक २५ मे, २०१६ पर्यंत सादर करावा. त्यानुसार आयोगाकडून याबाबतचा आढावा कुलगुरु व आपल्याकडून वेळोवेळी घेण्यात येईल.

मा. राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

आपला,

धमाकानेड

( ध. मा. कानेड )
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रत:-

१) कुलगुरु, (मुंबई विद्यापीठ,एम.जी.रोड,फोर्ट,मुंबई. श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ,मुंबई.सावीत्रीबाई फुले विद्यापीठ,जि.पुणे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ.जि.औरंगाबाद.स्वामी रामानंद तिर्थ, मराठवाडा विद्यापीठ,जि. नांदेड. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, जि. नागपूर.संत गाडगेबाबा विद्यापीठ, जि. अमरावती. शिवाजी विद्यापीठ,जि. कोल्हापूर. सोलरपूर विद्यापीठ,सोलापूर.उत्तर महाराष्ट्र, विद्यापीठ,जि.जळगाव. डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, जि. रायगड. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ,दापोली,जि. रत्नागीरी.डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ,कृषी नगर,जि. अकोला. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहूरी,जि. अहमदनगर. मराठवाडा कृषी विद्यापीठ,जि.परभणी. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, जि. नागपूर. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, जि. नाशिक.) यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता

२) मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता

३) विभागीय आयुक्त (सर्व ) यांना माहितीकरिता आणि जिल्हयातील महसूल यंत्रणा, महानगरपालिका आणि विद्यापीठ प्रतिनिधी, महाविद्यालयांचे प्राचार्य यांच्याशी समन्वय साधण्याकरिता आवश्यक ती उपाययोजना करण्याकरिता अग्रेषित.

४) महानगरपालिका आयुक्त (सर्व) यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता अग्रेषित.

५) तहसिलदार, (सर्व तालुके)

६) मुख्याधिकारी (संबंधित नगर परिषदा/नगर पंचायती)

७) अवर सचिव (कार्या-५ व ७)

८) निवड नस्ती

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/नप-२०१६/प्र.क्र. १२/का-६,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १० मे, २०१६.

प्रति,
जिल्हाधिकारी (सर्व),
महानगरपालिका आयुक्त,
(बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर,
नाशिक,अकोला, अमरावती, नागपूर)

विषय:- दिनांक- ०१/०१/२०१६ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या लोकांना मतदार ओळखपत्र (EPIC) वाटप करण्याचा सोहळा आयोजित करण्याबाबत...

महोदय,

आपणास माहितच आहे की, राज्यातील सुमारे १९५ नगरपरिषदा/नगर पंचायती, २६ जिल्हा परिषदा, २९६ पंचायत समित्या व १० महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका डिसेंबर-२०१६ ते मार्च-२०१७ या कालावधीत होणार आहेत.

२. या निवडणुकांमध्ये दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या पात्र व्यक्तींची नावे मतदार यादीमध्ये नोंदणी होणे आवश्यक आहे. जरी याबाबतची कार्यवाही भारत निवडणूक आयोगाच्या सूचनांप्रमाणे सतत चालू असली तरी, त्यामध्ये आवश्यक ती गती नसल्यामुळे राज्य निवडणूक आयुक्त यांच्या मा. राज्यपाल महोदयांशी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने मला आपणास असे आदेश देण्याच्या सूचना आहेत की, आपण ***दिनांक २५ जुलै, २०१६ व १६ ऑगस्ट, २०१६*** या दोन दिवशी मतदार ओळखपत्र (EPIC) वाटप करण्याचा सोहळा प्रत्येक जिल्हयामध्ये आणि प्रत्येक तालुक्यामध्ये राबवावा.

२. हा कार्यक्रम जिल्हयातील/तालुक्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात यावा. या कार्यक्रमासाठी स्थानिक महत्वाच्या व्यक्ती, पत्रकार, विद्यालयांचे प्राचार्य, विद्यार्थी यांना आमंत्रित करण्यात यावे. या कार्यक्रमामध्ये कमीत कमी १०० मुला-मुलींना (वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या) मतदार ओळखपत्राचे (EPIC) वाटप करावे. कार्यक्रमास मोठया प्रमाणावर प्रसिध्दी देण्यात यावी. यावर होणारा खर्च संबंधित संस्थांनी त्यांच्याकडील निधीतून भागवावयाचा आहे. तसेच सदर कार्यक्रमाचा अहवाल कार्यक्रमाच्या प्रत्येकी २-२ फोटोंसह राज्य निवडणूक आयोगास कार्यक्रम झाल्यापासून एक आठवडयात सादर करावा.

मा. राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

आपला,

( ध. मा. कानेड )
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत:-

१) कुलगुरु, (मुंबई विद्यापीठ,एम.जी.रोड,फोर्ट,मुंबई. श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ,मुंबई.सावीत्रीबाई फुले विद्यापीठ,जि.पुणे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ.जि.औरंगाबाद.स्वामी रामानंद तिर्थ, मराठवाडा विद्यापीठ,जि. नांदेड. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, जि. नागपूर.संत गाडगेबाबा विद्यापीठ, जि. अमरावती. शिवाजी विद्यापीठ,जि. कोल्हापूर. सोलरपूर विद्यापीठ,सोलापूर.उत्तर महाराष्ट्र, विद्यापीठ,जि.जळगाव. डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, जि. रायगड. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ,दापोली,जि. रत्नागीरी.डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ,कृषी नगर,जि. अकोला. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहूरी,जि. अहमदनगर. मराठवाडा कृषी विद्यापीठ,जि.परभणी. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, जि. नागपूर. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, जि. नाशिक.) यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता

२) मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता

३) विभागीय आयुक्त (सर्व ) यांना माहितीकरिता आणि जिल्हयातील महसूल यंत्रणा, महानगरपालिका आणि विद्यापीठ प्रतिनिधी, महाविद्यालयांचे प्राचार्य यांच्याशी समन्वय साधण्याकरिता आवश्यक ती उपाययोजना करण्याकरिता अग्रेषित.

४) महानगरपालिका आयुक्त (सर्व) यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता अग्रेषित.

५) तहसिलदार, (सर्व तालुके)

६) मुख्याधिकारी (संबंधित नगर परिषदा/नगर पंचायती)

७) अवर सचिव (कार्या-५ व ७)

८) निवड नस्ती

**<u>बैठकीची सूचना :- शुक्रवार दि.२९/०४/२०१६ वेळ :- स. ११.०० वा.</u>**
स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका .......
मतदार नोंदणी व मतदानाची टक्केवारी वाढविण्याकरीता
जनजागृती मोहिम राबविण्याबाबत.

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/ प्रकल्प-२०१६/ मतदार जागृती
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र. :- ०२२-२२८४६७२०
ई-मेल :- stateelectioncommission@gmail.com
दिनांक :- २२/०४/२०१६

प्रति,
मा. कुलगुरू,

१. मुंबई विद्यापीठ , एम. जी. रोड, फोर्ट, मुंबई.
२. श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.
३. सावित्रीबाई फुले विद्यापीठ, जि. पुणे.
४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, जि. औरंगाबाद.
५. स्वामी रामानंद तिर्थ, मराठवाडा विद्यापीठ, जि. नांदेड.
६. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, जि. नागपूर.
७. संत गाडगे बाबा विद्यापीठ, जि. अमरावती.
८. शिवाजी विद्यापीठ, जि. कोल्हापूर.
९. सोलापूर विद्यापीठ, जि. सोलापूर.
१०. उत्तर महाराष्ट्र, विद्यापीठ, जि. जळगांव.
११. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, जि. रायगड.
१२. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी.
१३. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, कृषीनगर, जि. अकोला.
१४. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहूरी, जि. अहमदनगर.
१५. मराठवाडा कृषी विद्यापीठ, जि. परभणी.
१६. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, जि. नागपूर.
१७. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, जि. नाशिक

विषय :- <u>बैठकीची सूचना :- शुक्रवार दि.२९/०४/२०१६ वेळ :- स. ११.०० वा.</u>
स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका .......
मतदार नोंदणी व मतदानाची टक्केवारी वाढविण्याकरीता जनजागृती मोहिम राबविण्याबाबत.
संदर्भ :- या विषयावर दि.१६/०३/२०१६ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत दि.१६/०३/२०१६ रोजी झालेल्या बैठकीत प्रमुख तीन मुद्दांवर चर्चा होऊन सहमतीने निर्णय घेण्यात आले. सदर बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत सोबत जोडण्यात आली आहे.

तसेच मा. राज्य निवडणूक आयुक्त यांनी बैठकीत जाहिर केल्याप्रमाणे पुढील बैठक शुक्रवार दि.२९/०४/२०१६ रोजी आयोजित केली असून यामध्ये विद्यापीठांकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत आढावा घेण्यात येईल.

तरी या बैठकीस आपण व्यक्तीश: व संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग यांनी उपस्थित रहावे ही विनंती.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(के. सूर्यकृष्णमूर्ती)
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :- मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र.

**विषय** :- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदार नोंदणी व मतदानाची टक्केवारी वाढविण्याकरीता जनजागृती मोहिम राबविण्यासाठी राज्यातील विद्यापीठांच्या कुलगुरू यांच्या समवेत झालेल्या दि.१६/०३/२०१६ रोजीच्या **बैठकीचे इतिवृत्त.**

---

मा. आयुक्त यांनी या बैठकीस उपस्थित असलेल्या कुलगुरू, कुलसचिव, संचालक- विद्यार्थी कल्याण विभाग तसेच व प्राध्यापक प्रतिनिधी यांना, राज्यामध्ये आगामी ऑक्टोबर २०१६ ते मार्च २०१७ या कालावधीत मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये विद्यापीठ व महाविद्यालय यांनी करावयाच्या कामासंदर्भात खालील तीन विषय प्रथम अवगत केले.

१. दरवर्षी जानेवारी महिन्यामध्ये १८ वर्षे वय पूर्ण करणारे बरेचसे मुले-मुली यांच्या नावाची नोंद मतदार यादीमध्ये होत नसल्याने, ते मतदानापासून वंचित राहतात.
२. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदानाच्या टक्केवारीचे प्रमाण नागरी क्षेत्रामध्ये अत्यंत कमी असते.
३. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकामध्ये अत्यंत कमी प्रमाणात झालेले संशोधन.

<u>लोकशाही सबळीकरणासाठी, राष्ट्रीय कर्तव्य मानून आवाहनात्मक स्वरूपात विद्यापीठ व महाविद्यालये मतदार नोंदणी व मतदान टक्केवारी वाढविण्यात महत्त्वाची भुमिका बजावू शकतात</u>, असे मा. आयुक्त यांनी स्पष्ट केले.

केवळ औपचारीकता म्हणून न पाहता **एक सामाजिक जाणीवेच्या भूमिकेतून या विषयाकडे पाहणे** आवश्यक असल्याचे सांगून मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांनी संबंधिताना भारत निवडणूक आयोगाच्या मतदार नोंदणीच्या प्रक्रियेबाबत थोडक्यात माहिती दिली.

या अनुषंगाने झालेल्या चर्चेअंती सर्व <u>विद्यापीठांनी</u> खालील मुद्दांबाबत कार्यवाही करण्यास सहमती दर्शविली :-

१. <u>मतदार नोंदणी करण्यासाठी</u> :-

i) मतदार नोंदणीच्या विशेष पुनरिक्षण कार्यक्रमाच्या दरम्यान महाविद्यालयात मतदार नोंदणी अधिकाऱ्यांना **<u>केंद्र स्थापन</u>** करण्यासाठी सहकार्य केले जाईल.

ii) सर्व महाविद्यालयांनी <u>नोडल अधिकारी नेमून</u>, नोडल अधिकाऱ्यांचे नाव, हुद्दा व मोबाईल क्रमांक संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर केले जाईल.

iii) विद्यार्थ्यांना प्रवेश देताना त्यांच्याकडून भरून घेण्यात येणाऱ्या प्रवेश अर्जांमध्ये त्यांनी मतदार यादीत नाव नोंदविले आहे किंवा नाही याची माहिती घेण्यात येईल. सर्व विद्यार्थ्यांकडून त्यांचे Elector's Photo Identity Card (Voter ID) क्रमांक प्राप्त करून घेण्याची व्यवस्था महाविद्यालये करतील. जेणेकरून <u>Database</u> निर्माण करता येईल.

iv) नोडल अधिकारी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून नमुना कोरे फॉर्म ६,७,८, व ८-अ प्राप्त केले आहे याची खात्री केली जाईल.

v) ज्या विद्यार्थ्यांकडून फॉर्म ६,७,८, व ८-अ भरून प्राप्त झाले आहेत, ते फॉर्म जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर केले असल्याची खात्री केली जाईल व तसा अहवाल विद्यापीठांना महाविद्यालयाकडून सादर केला जाईल.

२. मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी :-

i) विद्यापीठ/ महाविद्यालयांच्या विविध लेखनसामग्रीवर (उदा. ॲडमिशन व इतर फॉर्मस्, ब्रोशर्स, प्रवेश पत्रिका, माहिती पुस्तिका, पाठ्यपुस्तके, नोट बुक, इ.) तसेच संकेत स्थळावर ठळकपणे मतदानासंबंधात आवाहन करणारा मजकूर छापण्यात येईल.

ii) विविध वृत्तपत्रांमध्ये प्राध्यापक/विद्यार्थ्यांचे लेख प्रकाशित करण्यात येतील.

iii) आकाशवाणी, दूरदर्शन, खासगी वृत्तवाहिन्या, स्थानिक केबल इ. वरील चर्चासत्रात सहभाग घेणे व मतदानाचे महत्व विषद करावेत.

iv) मतदानाची टक्केवारी कमी असलेल्या वस्त्या / गृहनिर्माण संस्था / नजीकची कॉलनी दत्तक घेऊन मतदार नोंदणी आणि मतदानासाठी नागरिकांना प्रोत्साहित करणे मतदान जागृतीसाठी विशेष मोहिम राबविली जाईल.

v) एनएसएस, एनसीसीच्या विद्यार्थ्यांवर सामाजिक कार्यानुभव म्हणून मतदार जागृतीची जबाबदारी देण्यात येईल. मतदार जागृतीबाबत उत्कृष्ट काम करणाऱ्या एनएसएस, एनसीसीच्या विद्यार्थ्यांना गुण किंवा प्रमाणपत्रे दिली जातील.

vi) सोशल मिडियाचा वापर करून जास्तीत जास्त मुलांपर्यंत मतदानाविषयी जागृती निर्माण करण्यात येईल. उदा. Post the Pledge, Selfie Competition, इत्यादी.

vii) व्हर्च्युअल क्लासरुम किंवा ए व्ह्यू सॉफ्टवेअर च्या माध्यमातून जास्तीत जास्त मुलांशी संपर्क साधून मतदानाविषयी जनजागृती करण्यात येईल.

३. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत संशोधन वाढविण्यासाठी :-

i) पदव्युत्तर, एम. फिल., पीएच. डी. च्या विद्यार्थ्यांना लघुसंशोधन/शोधनिबंधासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका हा विषय सूचविण्यात येईल.

ii) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात आतापर्यंत झालेल्या संशोधनाची यादी संदर्भ म्हणून आयोगास पाठविण्यात येईल.

iv) विद्यापीठांच्या ग्रंथालयातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबतची पुस्तके, प्रकाशनांची यादी आयोगास पाठविण्यात येईल.

v) **तसेच प्रत्येक विद्यापीठांकडून प्रतीवर्षी किमान दोन विद्यार्थ्यांना या विषयाच्या संशोधनासाठी प्रोत्साहनपर शिष्यवृत्ती देण्यात येईल.**

मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरूंनी "युवा पिढीला मूलभूत अधिकारांचे महत्त्व समजण्यासाठी शैक्षणिक संस्थांचा मतदार जागृती अभियानात सहभाग" या विषयाबाबत, त्यांच्या व्यवस्थापन परिषदेत (Management Council) विषय मांडला असता **परिषदेनेही याबाबत** संपूर्ण सहकार्य करण्याचे कळविले असल्याचे मुंबई विद्यापीठाने त्यांच्या दि.११ मार्च, २०१६ च्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. यावेळी संदर्भीय मुंबई विद्यापीठाच्या पत्राची प्रत बैठकीत सर्व उपस्थितांना वितरित करण्यात आली.

मुंबई विद्यापीठाच्या या कार्यवाहीबाबत मा. आयुक्त यांनी समाधान व्यक्त केले. याच पध्दतीने इतर विद्यापीठांनीही त्यांचेकडील व्यवस्थापन परिषदेस या विषयाबाबत अवगत करून मतदार नोंदणी व मतदार जागृती अभियानात चांगली कामगिरी करावी, अशा सूचना मा. आयुक्तांनी यावेळी दिल्या.

या बैठकीत झालेल्या वरील निर्णयाच्या अनुषंगाने विद्यापीठांनी केलेल्या कार्यवाहीबाबत **पुढील बैठकीत म्हणजेच दि.२९/०४/२०१६ रोजी आढावा घेण्यात येईल.** यानंतर सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

********************

४९

ई-मेलद्वारे

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका .......
मतदार नोंदणी व मतदानाची टक्केवारी वाढविण्याकरीता जनजागृती मोहिम राबविण्याबाबत दि.२९/०४/२०१६ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/ प्रकल्प-२०१६/ मतदार जागृती
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र. :- ०२२-२२८४६७२०
ई-मेल :- stateelectioncommission@gmail.com
दिनांक :- ०९/०५/२०१६

प्रति,
मा. कुलगुरू,

१. मुंबई विद्यापीठ , एम. जी. रोड, फोर्ट, मुंबई.
२. श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.
३. सावित्रीबाई फुले विद्यापीठ, जि. पुणे.
४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, जि. औरंगाबाद.
५. स्वामी रामानंद तिर्थ, मराठवाडा विद्यापीठ, जि. नांदेड.
६. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, जि. नागपूर.
७. संत गाडगे बाबा विद्यापीठ, जि. अमरावती.
८. शिवाजी विद्यापीठ, जि. कोल्हापूर.
९. सोलापूर विद्यापीठ, जि. सोलापूर.
१०. उत्तर महाराष्ट्र, विद्यापीठ, जि. जळगांव.
११. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, जि. रायगड.
१२. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी.
१३. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, कृषीनगर, जि. अकोला.
१४. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहूरी, जि. अहमदनगर.
१५. मराठवाडा कृषी विद्यापीठ, जि. परभणी.
१६. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, जि. नागपूर.
१७. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, जि. नाशिक

विषय :- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका .......
मतदार नोंदणी व मतदानाची टक्केवारी वाढविण्याकरीता जनजागृती मोहिम राबविणे या विषयावर दि.२९/०४/२०१६ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत दि.२९/०४/२०१६ रोजी झालेल्या बैठकीत चर्चा होऊन सहमतीने निर्णय घेण्यात आले. सदर बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत सोबत जोडण्यात आली आहे.

या इतिवृत्तातील मुद्दा क्र.१२ मध्ये नमूद केलेल्या सर्व विद्यापीठांसाठीच्या निर्देशांचे संबंधित विद्यापीठांच्या अधिनस्त महाविद्यालयांकडून काटेकोरपणे पालन केले जाईल याची कृपया दक्षता घेण्यात यावी. तसेच वरील प्रकरणी आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास वेळोवेळी सादर करावा, ही विनंती.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(के. सूर्यकृष्णमूर्ती)
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत माहिती व पुढील उचित कार्यवाहीसाठी :-

१. मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र.
२. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
३. जिल्हाधिकारी (सर्व),

**विषय :-** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदार नोंदणी व मतदानाची टक्केवारी वाढविण्याकरीता जनजागृती मोहिम राबविण्यासाठी राज्यातील विद्यापीठांच्या कुलगुरू व संबंधित प्रतिनिधी यांच्या समवेत झालेल्या दि.२९/०४/२०१६ रोजीच्या **बैठकीचे इतिवृत्त.**

---

मा. आयुक्त यांनी या बैठकीस उपस्थित असलेल्या कुलगुरू, कुलसचिव, संचालक- विद्यार्थी कल्याण विभाग तसेच व प्राध्यापक प्रतिनिधी यांचे स्वागत करून वरील विषयासंदर्भात मागील बैठकीमध्ये निश्चित झाल्याप्रमाणे, प्रत्येक विद्यापीठांकडून करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचा आढावा घेतला. (उपस्थिती तक्ता संलग्न) **तसेच लोकशाही सबळीकरणासाठी, राष्ट्रीय कर्तव्य मानून आवाहनात्मक स्वरूपात विद्यापीठ व महाविद्यालये यांनी मतदार नोंदणी व मतदान टक्केवारी वाढविण्यात महत्त्वाची भुमिका बजावावी असे पुन्हा स्पष्ट केले.**

या बैठकीत संबंधित विद्यापीठांनी केलेल्या कार्यवाहीबद्दल खालीलप्रमाणे माहिती सादर केली.

१. **संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, जि. अमरावती :-**

- वरील विषयासंदर्भात अमरावती महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांसमवेत चर्चा होवून शहरातील जास्त व कमी मतदान टक्केवारी असलेल्या भागांची यादी तयार करण्यात आली आहे. यावेळी **मा. आयुक्त यांनी विद्यापीठाला संबंधित पाच जिल्हाधिकारी यांच्याशीही संपर्क साधून समन्वय ठेवण्याबाबत सूचना दिल्या.**
- विद्यापीठांतर्गत ६००० विद्यार्थी लोकसंख्या असलेल्या महाविद्यालयांची यादी व डेटाबेस तयार आहे. तसेच शहरातील युवा वर्गाला त्याच्या घरातील, त्याच्या आजूबाजुच्या परिसरातील लोकांमध्ये मतदार जागृती कशी करता येईल याचा कृती आराखडा तयार आहे. या अनुषंगाने विद्यापीठांतर्गत असलेल्या ४१६ महाविद्यालयांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत.
- या बैठकीत विद्यापीठाने खालीलप्रमाणे अहवाल सादर केले.
  - i) संबंधित विद्यापीठाने दि.२६/०४/२०१६ व दि.२७/०४/२०१६ रोजी आयोगास लिहिलेल्या पत्रात, त्यांच्या संलग्नित महाविद्यालयांना वरील विषयावर कार्यवाही करून कार्यवाहीचा अहवाल पाठविण्याबाबतचे नमूद केले आहे.
  - ii) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसदर्भात ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या पुस्तकांची यादी.
  - iii) २ हॅन्डबील - हम मिलकर महाराष्ट्र बदलेंगे व संकल्प.
  - iv) निवडणूक संदर्भातील जनजागृतीकरीता प्रकाशित ३९ लेखांच्या छायांकित प्रती.
  - v) डॉ. विनोद गायकवाड लिखित भारतीय लोकशाहीतील स्थित्यंतरे या पुस्तकाची प्रत.

२. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर जि. कोल्हापूर :-

विद्यापिठाच्या दि.२८/०४/२०१६ रोजीच्या आयोगास लिहीलेल्या पत्रान्वये, संलग्नित महाविद्यालयांना मतदार नोंदणी कक्ष स्थापन करणे, नोडल अधिकाऱ्यांची नेमणूक, प्रवेश अर्जात मतदार यादीत नावे नोंदविली आहे किंवा नाही याबाबत कॉलम समाविष्ट करणे व इतर सूचना देण्यात आल्या असल्याबाबत नमूद केले आहे. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत एम. फिल, पी. एच. डी. च्या विद्यार्थ्यांना शोध निबंध लिहीण्याबाबत राज्यशास्त्र अधिविभागास कळविले आहे. प्रतीवर्षी किमान दोन विद्यार्थ्यांना स्था. स्व. सं. निवडणुकांबाबत प्रोत्साहनपर शिष्यवृत्ती देण्याकरीता महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळे यांना कळविण्यात आले आहे. विद्यापीठातील सर्व शिक्षक व शिक्षिकेतर कर्मचारी यांचे मतदार कार्ड व आधार कार्ड पगार पत्रकास जोडले असल्याचेही नमूद केले आहे.

- या बैठकीत विद्यापीठाने खालीलप्रमाणे अहवाल सादर केले.
  - i) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसदर्भात ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या पुस्तकांची यादी.
  - ii) SVEEP-कार्यक्रम अंमलबजावणी अहवाल २०१५-१६ (विद्यार्थी कल्याण व राष्ट्रीय सेवा योजना) व माहिती पुस्तिका.
  - iii) नियुक्त करण्यात आलेल्या ४९ कॅम्पस् ॲम्बेसेडर यांचा तपशिल.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद :-

- या बैठकीत विद्यापीठाने खालीलप्रमाणे अहवाल सादर केले :
  - i) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसदर्भात ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या पुस्तकांची व एम. फिल/पी. एच. डी. कोर्सेससाठी विद्यापीठाकडे असलेल्या शोध निबंधाची यादी.
  - ii) वरील विषयाबाबत अंमलबजावणी करत असल्याबाबतचे आयोगास उल्लेखित दि.२७/०४/२०१६ चे पत्र.

४. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक जि. नाशिक :-

वरील विषयाबाबत आयोगाच्या दि.१६/०३/२०१६ च्या बैठकीत झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासंदर्भात अधिनस्त ३०० महाविद्यालयांना कळविण्यात आले आहे. तसेच प्रत्येक विद्यार्थ्याला PRN क्रमांक देतेवेळी मतदार ओळखपत्राचा क्रमांकही त्याच्याशी संलग्न करण्यात येईल. असे विद्यापीठाच्या प्रतिनिधींनी या बैठकीत नमूद केले.

ii) विद्यापीठाच्या संकेतस्थळावर मत शक्ती नावाने मतदारांना आवाहन करण्यात आले आहे.

९. **महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, जि. नागपूर :-**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसदर्भात ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या पुस्तकांची व पी. एच. डी. कोर्ससाठी विद्यापीठाकडे असलेल्या शोध निबंधाची यादी निरंक असल्याबाबत आणि वरील विषयाबाबत विद्यापीठ स्तरावर समिती गठीत केली असल्याबाबत संबंधित प्रतिनिधींनी नमूद केले आहे. तसेच संबंधित विद्यापीठाचे विषय हे तांत्रिक स्वरूपाचे असल्यामुळे निवडणुकीसारख्या विषयावर संबंधित विद्यार्थ्यांकडून संशोधन करणे शक्य नाही ही बाब नमूद केली. मात्र आयोगाच्या इतर सूचनांवर कार्यवाही करण्यात येत असल्याबाबत संबंधित प्रतिनिधींनी कळविले.

१०. **मुंबई विद्यापीठ, मुंबई :-**

आयोगाच्या मतदार जागृती संदर्भातील गठीत झालेल्या समितीत विद्यापीठाचे दोन प्रतिनिधी कार्यरत असल्याबाबत तसेच राजीव गांधी सेंटर फॉर कंटेपप्ररी स्टडीज् च्या माध्यमातून या विषयावर कार्यवाही सुरू असल्याबाबत संबंधित प्रतिनिधींनी यावेळी नमूद केले.

११. यानंतर कुलगुरू, संत गाडगेबाबा विद्यापीठ,अमरावती यांनी त्यांच्या स्तरावरून या विषयावर सुरू असलेल्या कार्यवाहीबाबत उपस्थितांना माहिती दिली. तसेच, खालीलप्रमाणे सकारात्मक बाबी सर्वांच्या निदर्शनास आणल्या :-

१. विद्यापीठांकडे असलेल्या एकूण ६६ ध्येयांपैकी एक ध्येय म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये जबाबदार नागरिक तयार करणे. या विषयाच्या माध्यमातून हे ध्येय साध्य करण्याची उत्तम संधी आयोगाने उपलब्ध करून दिली असल्याबाबत कुलगुरू यांनी राज्य निवडणूक आयुक्त यांचे आभार मानले.
२. लोकल इंक्वायरी कमिटीमार्फत विद्यापीठातील / महाविद्यालयातील किती विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी झाली आहे या निकषावर अनुदान पात्रता ठरविता येईल.
३. विद्यार्थ्यांना प्रवेश क्रमांक देतेवेळी त्यांचा मतदार ओळखपत्राचा क्रमांकही संलग्न करण्यात येऊ शकतो. दरवर्षी माहे जून ते ऑगस्ट या कालावधीत पुढील शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थ्यांनी प्रवेश घेताना ही योजना राबविल्यास १०० % विद्यार्थ्यांची नावे संबंधित मतदार यादीत नोंदविता येणे शक्य आहे.
४. या विषयावर विद्यार्थी परिषदेचे सहकार्य घेता येईल.

५. **सावित्रिबाई फुले विद्यापीठ, पुणे जि. पुणे :-**

- राष्ट्रीय सेवा योजना विभागात ५३,००० स्वयंसेवक असून ४३० गावे दत्तक घेण्यात आली आहेत. त्यामुळे रा. से. यो. व विद्यार्थी कल्याण मंडळ यांनी SVEEP अंतर्गत वरील विषयी अंमलबजावणी करण्याबाबत आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या असून माहिती पुस्तिकाही प्रसारीत करण्यात आली आहे.
- या बैठकीत विद्यापीठाने खालीलप्रमाणे अहवाल सादर केले.
    i) वरील विषयाबाबत अंमलबजावणी करत असल्याबाबतचे आयोगास उल्लेखित दि.२८/०४/२०१६ चे पत्र. (विशेष नोंद- विद्यापीठाच्या संकेतस्थळावर I Will Vote या नावाने नवी लिंक तयार करण्यात आली असून मतदार जागृतीबाबत व्हिडीओ प्रदर्शित केले आहे. तसेच मतदार नोंदणी व मतदान जनजागृती या विषयावर शॉर्ट फिल्म स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून याच्या प्रती आयोगासही पाठविण्यात येतील).
    ii) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसदर्भात ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या पुस्तकांची व एम. फिल/पी. एच. डी. कोर्सेससाठी विद्यापीठाकडे असलेल्या शोध निबंधाची यादी.
    iii) SVEEP माहिती पुस्तिका.

६. **डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, कृषीनगर जि. अकोला :-**

विद्यापीठाने त्यांच्या दि.२७/०४/२०१६ च्या पत्रान्वये संलग्नित महाविद्यालयांना आयोगाच्या दि.१६/०३/२०१६ च्या बैठकीतील निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत पत्र पाठविले आहे. (प्रत संलग्न)

७. **स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, जि. नांदेड :-**

- या बैठकीत विद्यापीठाने खालीलप्रमाणे अहवाल सादर केले :
    i) विद्यापीठाने आयोगास उल्लेखित केलेल्या दि.२८/०४/२०१६ च्या पत्रान्वये संलग्नित महाविद्यालयांकडून वरील विषयाबाबत अंमलबजावणी करण्यात येत असल्याबाबत कळविले आहे. (प्रत संलग्न)
    ii) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसदर्भात ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या पुस्तकांची व एम. फिल/पी. एच. डी. कोर्सेससाठी विद्यापीठाकडे असलेल्या शोध निबंधाची यादी.

८. **राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, जि. नागपूर :-**

- या बैठकीत विद्यापीठाने खालीलप्रमाणे अहवाल सादर केले :
    i) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसदर्भात ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या पुस्तकांची व पी. एच. डी. कोर्सेससाठी विद्यापीठाकडे असलेल्या शोध निबंधाची यादी.

१२. मा. आयुक्त यांनी सर्व विद्यापीठांना खालीलप्रमाणे निर्देश दिले :-

१. सर्व विद्यापीठांनी या विषयावर रुपरेषा / माहिती पुस्तिका तयार करून आयोगास पाठवावी.
२. मुंबई विद्यापीठाने ज्या प्रमाणे वॉल स्ट्रीट पेंटींगच्या माध्यमातून सामाजिक संदेश देण्याचा / वारसा संवर्धन / शहर सौंदर्यकरणाचा विषय हाताळला आहे, त्या प्रमाणे हाही विषय घ्यावा व इतर विद्यापीठांनीही या प्रमाणे नाविन्यपूर्ण उपक्रम राबवावेत.
३. व्हर्च्युअल क्लासरूमच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये मतदार जागृती अभियान राबविता येईल.
४. विद्यापीठांनी महाविद्यालयातील विद्यार्थीसंख्येच्या प्रमाणात त्यांचे वर्गीकरण करून त्यांच्यात या विषयावर स्पर्धा आयोजित करून त्याद्वारे वातावरण निर्मिती करावी. असे करताना प्रोत्साहनपर (Incentives)/ प्रतिबंधात्मक (disincentives) या दोन पध्दतीची जबाबदारीची भूमिका महाविद्यालयांनी पार पाडणे अपेक्षित आहे.
५. उप कुलगुरू यांनी जिल्हाधिकारी तसेच महानगरपालिका आयुक्त यांच्याशी समन्वयासाठी नोडल अधिकाऱ्यांची नेमणूक करावी.
६. मा. राज्यपाल महोदय यांनी सूचविल्याप्रमाणे माहे जुलै, २०१६ व माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये मतदार ओळखपत्र वाटप करण्याचा सोहळा राबविण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी यांच्याशी समन्वय साधण्याचे निर्देश आपणाकडून आपल्या आपल्या विद्यापीठाच्या अधिनस्त सर्व महाविद्यालयांना देण्यात यावेत.

अशाप्रकारे वरीलप्रमाणे अंमलबजावणी करण्याबाबत मा. आयुक्त यांनी सर्व संबंधितांना सूचना देवून बैठकीचा समारोप झाला.

*****